सन २०१९-२० या वर्षाकरिता ३३ कोटी “वृक्ष लागवड आणि संगोपन,” या कार्यक्रमाच्या अमंलबजावणीसाठी निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय, क्र. संकीर्ण- २०१८/प्र.क्र.१०१/२२-स
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २५ जून, २०१९.

वाचा :- १) शासन निर्णय, महसुल व वन विभाग क्रमांक:- साववि- २०१६/प्र.क्र.८०(भाग-२)/ फ-११, दिनांक २५ जुलै, २०१८

२) शासन निर्णय, महसुल व वन विभाग क्रमांक:- साववि-२०१८/प्र.क्र.१४४/फ-११, दिनांक ६ सप्टेंबर, २०१८

३) शासन निर्णय, समक्रमांक दिनांक, २७ फेब्रुवारी, २०१९

४) शासन निर्णय, क्रमांक:- लेखानु-२०१९/प्र.क्र.१२/१९/१७-स, दिनांक २ एप्रिल, २०१९

५) शासन निर्णय, महसुल व वन विभाग क्रमांक:- साववि-२०१९/प्र.क्र.५४/फ-११ दिनांक १५ जून, २०१९

शासन निर्णय:-

सन २०१९-२० या वर्षाकरिता ३३ कोटी “वृक्ष लागवड आणि संगोपन,” या कार्यक्रमाची अमंलबजावणी करण्यासाठी नवीन लेखाशीर्ष घेऊन, त्याअंतर्गत एकंदर अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी कार्यक्रमावरील खर्चातून ०.५ % टक्के मर्यादेत तरतूद उपलब्ध करुन घेण्यास महसूल व वन विभागाने संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. तसेच, सन २०१९ मधिल पावसाळ्यात करावयाच्या नियोजित ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमातंर्गत विविध प्रशासकीय विभाग व यंत्रणा तसेच, ग्रामपंचायतींना जिल्हानिहाय उद्दिष्ट/लक्षांक महसूल व वन विभागाने संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये दिले आहेत. त्यानुसार सन २०१९ या वर्षाकरिता सहकार, पणन व वस्त्रोद्योग या तीन प्रभागांसाठी स्वतंत्र उद्दिष्ट/लक्षांक देण्याऐवजी वस्त्रोद्योग हा प्रभाग वगळता सहकार व पणन या प्रभागासाठी एकूण ९१६०५० इतका एकत्रित उद्दिष्ट/लक्षांक (सहा प्रादेशिक विभागासाठी) महसूल व वन विभागाने संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये दिला आहे. सहकार प्रभागाची बहूतांश कार्यालये ही खाजगी भाड्याच्या जागेत कार्यरत आहेत.पणन प्रभागाकडे मार्केट कमिटीच्या स्वत:च्या मालकीच्या जागा आहेत. त्यामुळे वरील वर्षाकरिता सहकार व पणन या प्रभागासाठी अनुक्रमे ४० % आणि ६० % या प्रमाणात उद्दिष्ट/लक्षांक प्रादेशिक विभागनिहाय खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

अ.क्र.	प्रादेशिक विभागाचे नाव	महसूल वन विभागाने सहकार व पणन या प्रभागासाठी दिलेला एकत्रित लक्षांक	सहकार प्रभागासाठी प्रस्तावित %४० लक्षांक	पणन प्रभागासाठी प्रस्तावित %६० लक्षांक
१	नागपूर	१५४१५०	६१६६०	९२४९०
२	अमरावती	४४६५०	१७८६०	२६७९०
३	औरंगाबाद	१५६००	६२६४०	९३९६०
४	नाशिक	१४४१००	५७६४०	८६४६०
५	कोकण	३९६५०	१५८६०	२३७९०
६	पुणे	३७६९००	१५०७६०	२२६१४०
	एकुण	९१६०५०	३६६४२०	५४९६३०

२. वृक्ष लागवड आणि संगोपन या कार्यक्रमाकरिता सहकार व पणन या प्रभागासाठी अनुक्रमे ३६६४२० (४० %) व ५४९६३० (६० %) या प्रमाणात निश्चित केलेल्या उद्दिष्टाप्रमाणे/लक्षांकाप्रमाणे कार्यवाही सहकार आयुक्त व निबंधक, कार्यालय पुणे तसेच, पणन संचालक, कार्यालय पुणे यांनी करावी. सन २०१९-२० या वर्षासाठी प्रस्तुत योजनेकरिता एकुण मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीच्या (रु.४१४.०० लाख) १/३ निधी रु. १३८.०० लाख वितरणासाठी उपलब्ध आहे. त्यानुसार वरील योजनेअंतर्गत बाबनिहाय तरतूद (०२-मजूरी रू. ६९.०० लाख व २१-पुरवठा व सामग्री रु. ६९.०० लाख) खालीलप्रमाणे सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय, पुणे यांना वितरित करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	बाब	तरतूद रु. लाखात
१.	पूर्व पावसाळी कामासाठी (उदा. खड्डे तयार करणे इ. कामासाठी)	६९.००
२.	रोपे खरेदी व रोपे लागवड (वाहतुकीच्या खर्चासह)	६९.००
	एकूण	१३८.००

३. वृक्ष लागवड आणि संगोपन या कार्यक्रमाकरिता निधी वितरणासाठी **नियंत्रक अधिकारी** तसेच **आहरण व संवितरण अधिकारी** म्हणून डॉ.पी.एल. खंडागळे, अपर निबंधक (सर्वसाधारण), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना याद्वारे घोषित करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाकरिता वितरणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या निधीमधून प्रत्यक्षात येणाऱ्या किमान खर्चानुसारच निधीचा विनियोग विहित कार्यपध्दतीने करण्याची दक्षता घ्यावी.

४. वृक्ष लागवड आणि संगोपन या कार्यक्रमाकरिता सहकार, पणन व वस्त्रोद्योग या तिन्ही प्रभागांसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष असल्यामुळे सदर प्रभागासाठी स्वतंत्र समन्वय अधिकारी (Nodal Officer) म्हणून अनुक्रमे उपसचिव (का. २२-स), उपसचिव (पणन) तसेच ,सहसचिव (वस्त्रोद्योग) हे राहतील.

५. वृक्ष लागवड आणि संगोपन याअंतर्गत यापूर्वी वृक्ष लावलेल्या किंवा या वर्षी लावण्यात येणाऱ्या वृक्षांचे संरक्षण, संगोपनाबाबत व वृक्ष जिवंत रहाण्याचे प्रमाण या संदर्भातील माहिती

संकलित करुन ती **दर तीन महिन्यांनी** प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) नागपूर, प्रधान सचिव (वने) व या विभागाच्या संबंधित प्रधान सचिव यांना पाठवावी.

६. वरील बाबीवर होणारा खर्च, मागणी क्र. व्ही-२, २४०६, वनीकरण व वन्यजीवन ०४, वनीकरण व पर्यावरण विकास१०१, राष्ट्रीय वनीकरण व पर्यावरणविकास कार्यक्रम(००)(००) (०१) शाश्वत विकास ध्येय (ध्येय (२४०६ए४०७) १५- जमिनीवरील सजीव)या करीतावृक्ष लागवड आणि संवर्धन (१०० टक्केराज्य योजना) (सहकार) (कार्यक्रम)०२- मजुरी, २१- पुरवठा व सामग्री या खाली सन २०१९-२० या वित्तीय वर्षामध्ये मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

७. उक्त शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१९०६२६१२५०३३६७०२ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJU KALLUJI NARPANDE

Digitally signed by RAJU KALLUJI NARPANDE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=445c05397d3e5fac583c028b06de2a1fa2b53743e982f5c31c9f3ffb560b0c16, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=f8faa195025519ecce143f48fe16b8572d279b7779146441b412b267fb25acd8, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJU KALLUJI NARPANDE
Date: 2019.06.26 13:00:40 +05'30'

(राजू क. नरपांडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव
३. प्रधान सचिव (सहकार)यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
४. प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
५. प्रधान सचिव (पणन) यांचे स्वीय सहाय्यक
६. सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहाय्यक
७. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे
८. मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर
९. पणन संचालक, पणन संचालनालय, पुणे
१०. महालेखापाल (ले व अ) महाराष्ट्र-१ व २ मुंबई/नागपूर
११. महालेखापाल (ले.प) महाराष्ट्र-१ व २ मुंबई/नागपूर
१२. उपसचिव (का. २२-स) यांचे स्वीय सहाय्यक
१३. उपसचिव (पणन) यांचे स्वीय सहाय्यक
१४. सहसचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहाय्यक
१५. उपसचिव (अर्थसंकल्प) सहकार, पणन व वस्त्रोद्योग
१६. डॉ.पी.एल खंडागळे, अपर निबंधक (सर्वसाधारण), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. सर्व संबंधित जिल्हा कोषागार कार्यालये
१८. निवडनस्ती का. २२-स